## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ (१) (बी) (पाच)

### नमुना (ड)

### राज्य पोलीस मुख्यालयाशी संबंधीत परिपत्रके

| अ.क्र. | विषय | क्रमांक व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | म.रा.पो.ग,.नि.व.क.म.म.महाराष्ट्र व सा.बा.वि.यांच्याकडे सोपविण्याचे कामाबाबत | क्र.पोमसं/२७/२८-बी/बांधकामे/२००४, दि७.१०.२००४ | -- |
| २ | निवासी व अनिवासी इमारती बांधकामाचे अंदाजपत्रक व नकाशे शासनास सादर करणेबाबत. | क्र.पोमसं/२७/२८-बी/-२/बांधकामे/२००३, दि.१३.६.२००३ | |
| ३ | नवीन बाबींचे प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजूरीसाठी सादर करणेबाबत | क्र.पोमसं/२७/७२१७/रिपोअर पोलीस बिल्डींग/२००४, दि ४.१२.२००४ | |
| ४ | लिपीकवर्गीय अधिकारी /कर्मचारी/चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे आस्थापनाविषयक कार्यालयीन आदेश /धोरणात्मक परिपत्रके | -- | जतन करून ठेवण्यात आली आहे |
| ५ | मा.राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांचेकडील आदेश क्र रामाआ-अपिल क्र बीएम-५२७७/२०१७ दि ३१.०५.२०१८ पोलीस विभाग कार्यालयांतील अभिलेखांची यादी,जतन करावयाच्या कालावधीसह नोंदवह्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत | क्र.पोमसं/३६/र.व का.(८३००)/रामाआ अपिल क्र.बीएम-५२७७/१७/ २०१८, दि १२.०६.२०१८ | -- |

**मा.अ.अधिनियम /राज्य माहिती आयोग प्रकरण**
क्र.पोमसं/३६/र.व का. (८३००)/रामाआ अपील क्र बीएम/५२७७/१७/२०१८ मुंबई दिनांक १२ /०६/२०१८

संदर्भ :- मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे आदेश क्र. रामाआ- अपील क्र बीएम ५२७७/२०१७, दिनांक ३१.०५.२०१८

विषय :- **माहिती अधिकार अधिनियम, २००५**
**श्री. सचिन सिताराम कुन्हाडे, कल्याण (पश्चिम)**

****

मा. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ३१.०५.२०१८ च्या आदेशान्वये " **पोलीस ठाण्याच्या स्तरावरील माहिती पोलीस ठाण्यामध्ये जतन करावयाचा अभिलेख व त्याची वर्गवारी संकेतस्थळावर दिनांक ०५.०६.२०१८ पर्यंत प्रसिध्द करावी, तसेच त्यावरील पोलीस अधीक्षक / उपायुक्त व महानिरीक्षक / अपर आयुक्त यांच्या स्तरावर ठेवण्यात आलेला अभिलेख दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंत प्रसिध्द करण्याचे** " निर्देश दिले आहेत. (सोबत प्रत संलग्न)

तरी, सर्व घटकप्रमुखांना विनंती आहे की, त्यांचे अधिपत्याखालील पोलीस ठाणे, सहा पोलीस आयुक्त / पोलीस उपअधीक्षक, पोलीस उपायुक्त / पोलीस अधीक्षक, अपर पोलीस आयुक्त यांना त्यांचे पोलीस ठाण्यातील / कार्यालयातील अभिलेखाची यादी, जतन करावयाच्या कालावधीसह व नोंदवहया संकेतस्थळावर **एका आठवडयात** प्रसिध्द करण्याबाबत सूचना द्याव्यात. तसेच कोणत्याही परिस्थितीत गोपनिय माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द होणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास दिनांक २१.०६.२०१८ पर्यंत सादर करावा. तसेच सुलभ संदर्भासाठी या कार्यालयाच्या स्तरावरील जे अभिलेख जतन केले जातात, त्या अभिलेखाची यादी जतन कालावधीसह या कार्यालयाचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे, त्याचे कृपया अवलोकन करावे.

( अनुप कुमार सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त (मुंबई शहर वगळून )
सर्व पोलीस अधीक्षक, (लोहमार्ग, मुंबईसह )

प्रत,
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
दाखल झालेले अपील

(13)

**रामाआ - अपील क्र. बीएम - ५२७७/२०१७**

**अपिलार्थी श्री. सचिन सिताराम कुऱ्हाडे**
द्वारा-अन्याय निवारण सेवा समिती (रजि.), ऑफिस नं. २२, सुर्यमुखी को.ऑप. हौ.सो.लि.,
रहेजा कॉम्प्लेक्स समोर, पत्रीपुलाजवळ, कल्याण (पश्चिम)-४२१३०१.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ कार्यासन अधिकारी**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानिरिक्षक यांचे उपसहायक**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

Desk No. 36.
9/1/2018
5746/18

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०१.२०१८**

State Information Commission, Greater Mumbai

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०५.२०१७ | २८.०६.२०१७ | ०३.०७.२०१७ | १८.१०.२०१७ |

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. २४.०५.२०१७ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, पोलीस महासंचालक कार्यालयाच्या विभागीय चौकशी कार्यासन क्र. ११ तसेच कार्यासन क्र. ११ अ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ (१) (ए) तसेच कलम ४ (१) (बी) (सहा) अन्वये झालेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने मुद्दा क्र. (१) ते (३) अन्वये विचारणा करुन माहिती/ कागदपत्रांची मागणी केलेली होती.

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. १६.११.२०१७ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, प्राप्त झालेली माहिती अयोग्य, अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे.

व्दितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने असे विशद केले की, त्यांना कलम ४ (१) (ख) अन्वये झालेल्या कार्यवाहीबाबत मिळालेल्या उत्तराबद्दल समाधान आहे. तथापि, कलम ४ (१) (क) बद्दल माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकाऱ्याने असे विशद केले की, अपिलार्थीना वस्तूस्थितीप्रमाणे उत्तर देण्यात आले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, अपिलार्थीनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ (१) (क) व त्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा निर्णय क्र. केमाआ-२००५/प्र.क्र. १९०/०५/५, दि. ०६.०८.२००५ प्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती विचारली होती. याप्रमाणे कार्यवाही झाली नाही, म्हणून दिलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत ठरविलेल्या प्रक्रियेप्रमाणे बरोबर असली तरी माहितीचा अधिकार अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता उक्त कार्यवाही होणे अपेक्षित आहे. आयोग माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९ (८) अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना असे निर्देश देत आहे की, त्यांनी यासंबंधी पोलीस ठाण्यापासून पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर जे अभिलेख जतन केले जातात त्याची यादी तयार करुन दि. ३१.०३.२०१८ पर्यंत कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व याबाबत पारीत केलेल्या प्रशासकीय आदेशाची प्रत प्रथम अनुपालन म्हणून दि. ३१.०१.२०१८ पर्यंत आयोगास पाठवावी.

**आदेश**

**उक्त निर्देशासह अपील अंशतः मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

अजित कुमार जैन

**मुंबई**
**दिनांक : ०४.०१.२०१८**

**(अजित कुमार जैन)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission, Greater Mumbai

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित,
पोलीस महासंचालक, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

249

## रामाआ - अपील क्र. बीएम - ५२७७/२०१७

**अपिलार्थी श्री. सचिन सिताराम कुऱ्हाडे**
ग्राहक न्याय निवारण सेवा समिती (रजि.), ऑफिस नं. २२, सुर्यमुखी को.ऑप. हौ.सो.लि.,
रहेजा कॉम्प्लेक्स समोर, पत्रीपुलाजवळ, कल्याण (पश्चिम)-४२१३०१.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ कार्यासन अधिकारी**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा महानिरिक्षक यांचे उपसहायक**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.

उक्त प्रकरणी आयोगाने दि. ०४.०१.२०१८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९ (८) अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना असे निर्देश दिले होते की, त्यांनी यासंबंधी पोलीस ठाण्यापासून पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर जे अभिलेख जतन केले जातात त्याची यादी तयार करुन दि. ३१.०३.२०१८ पर्यंत कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व याबाबत पारीत केलेल्या प्रशासकीय आदेशाची प्रत प्रथम अनुपालन म्हणून दि. ३१.०१.२०१८ पर्यंत आयोगास पाठवावी.

उक्त आदेशानुषंगाने, विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांनी त्यांच्या दि. १८.०१.२०१८ च्या पत्रान्वये असे निदर्शनास आणले आहे की, पोलीस मुख्यालयातील जुने दस्तावेज हे मोठ्या प्रमाणावर असून, त्याचे स्कॅनिंग आणि डिजीटायझेशन करण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला असता, त्यास शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. संपूर्ण राज्यातील असा अभिलेख स्कॅनिंग आणि डिजीटायझेशन करण्याकरिता कंपन्यांचे इम्पॅनलमेंट करण्यासाठी उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार माहिती तंत्रज्ञान विभागाकडून RFP तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. शासनाकडून इम्पॅनलमेंटची कार्यवाही झाल्यानंतर, पोलीस महासंचालक कार्यालयातील अभिलेखाचे digitization करून संकेतस्थळावर प्रसिध्द करता येईल. यास्तव, आयोगाच्या आदेशाचे अनुपालन करण्याकरिता मुदत वाढवून मिळावी, अशी विनंती करण्यात आली होती. त्यानुसार, अनुपालनाकरिता त्यांना दि. ३०.०१.२०१८ रोजीच्या आदेशान्वये, दि. ३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी दि. ०५.०३.२०१८ च्या पत्राने आयोगाच्या आदेशाप्रमाणे, राज्यातील सर्व घटक प्रमुखांना दि. २१.०२.२०१८ रोजी यासंदर्भात आदेश दिल्याबद्दल कळविले. या पत्रासोबत त्यांनी पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर जतन केलेल्या १५८ प्रकारच्या अभिलेखांची यादी जोडून पाठविली आहे. या यादीमध्ये प्रत्येक वर्गवारीतील अभिलेखाचा जतन कालावधीसुध्दा नमूद करण्यात आला आहे. (सदर पत्राची प्रत या आदेशाशी संलग्न आहे.)

आयोगाच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक दि. १०.०४.२०१८ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत आयोगाने दिलेल्या उक्त आदेशाचे स्पष्टीकरण करण्यात आले. आयोगाने सदर अपील प्रकरणी आदेश देताना पोलीस यंत्रणेतील - पोलीस ठाणेपासून ते पोलीस महासंचालक कार्यालयापर्यंत जतन करून ठेवलेल्या अभिलेखाची यादी व वर्गीकरण प्रसिध्द करण्यासाठी

आदेश दिले होते. त्या त्या वर्गाखालील सर्व अभिलेखाचे स्कॅनिंग आणि डिजीटायझेशन करावे, असे आदेश नव्हते. या आढावा बैठकीमध्ये असे दिसून आले की, पोलीस महासंचालक कार्यालयाने, पोलीस मॅन्युअल, क्रिमिनल प्रोसीजर कोड व महाराष्ट्र पोलीस ॲक्ट या आधारे जे आदेश पारीत केले असतील, त्यानुसार पोलीस ठाण्याच्या व इतर स्तरावर अभिलेख जतन करण्यात येतो. म्हणून यानुसार अभिलेखाचा प्रकार व जतन करावयाचा कालावधी याविषयी वर्गीकरण करण्यात व तो प्रसिध्द करण्यात काहीही अडचण नाही. अशी कार्यवाही पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या स्तरावर झालेली आहे. मुंबईतील पोलीस ठाणी व इतरत्र असलेली पोलीस ठाणी यांच्या प्रक्रियेमध्ये काहीही फरक नाही. संपूर्ण राज्यातील पोलीस ठाण्यांच्या स्तरावर असलेला अभिलेख/ नोंदवह्या यांची **यादी** आयोगास सादर करणे व पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, सहज शक्य आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये मा. उच्च न्यायालयास, गृह विभागाने सादर केलेली एक रिट याचिका अमान्य करून पोलीस मॅन्युअलची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्रगट करणे आवश्यक आहे, असा निर्णयही दिला आहे.

आयोगाने जे आदेश दिले आहेत त्याचे पालन करुन पोलीस मॅन्युअल अंतर्गत, कोणतीही संवेदनशील किंवा गोपनीय माहिती वगळून जतन करावयाचा अभिलेख व वर्गवारी पब्लिक डोमेनमध्ये आणणे आवश्यक आहे. इतर काही राज्यामध्ये पोलीस महासंचालक यांनी पोलीस ठाण्याच्या स्तरावर असलेला अभिलेख उदा. स्टेशन डायरी, लॉकअप रजिस्टर इ. ची यादी व वर्गवारी यापूर्वीच प्रसिध्द केली आहे. आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अशा प्रकारच्या माहितीचा संबंध सर्वसाधारण नागरिकांशी असून याबाबत पब्लिक डोमेनमध्ये माहिती नसल्यामुळे पोलीस ठाण्यातील अधिकारी अनेकदा अशी माहिती नाकारीत आहेत,

पोलीस ठाण्याच्या स्तराबरोबरच वरील स्तरावर अर्थात सहाय्यक पोलीस आयुक्त, उप विभागीय पोलीस अधिकारी, परिमंडळीय पोलीस उपायुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक व इतर वरिष्ठ पातळीवर जतन करून ठेवण्यात आलेल्या अभिलेखाचा प्रकार व नोंदवह्यांची यादीदेखील आता प्रसिध्द करणे अडचणीचे नाही. आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

## आदेश

**पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस ठाण्याच्या स्तरावरील माहिती पोलीस ठाण्यामध्ये जतन करावयाचा अभिलेख व त्याची वर्गवारी संकेतस्थळावर दि. ०५.०६.२०१८ पर्यंत प्रसिध्द करावी. तसेच, त्यावरील पोलीस अधीक्षक/ उपायुक्त व महानिरीक्षक/ अपर आयुक्त यांच्या स्तरावर ठेवण्यात आलेला अभिलेख दि. ३०.०६.२०१८ पर्यंत प्रसिध्द करावा. पोलीस महासंचालक कार्यालयातील विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांनी दि. ०२.०७.२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वत: उपस्थित राहून आयोगाकडे अनुपालन सादर करावे. या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ३१.०५.२०१८**

**(अजित कुमार जैन)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित,
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), पोलीस महासंचालक, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.